कॅन्टीन विभागाकरीता १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडर खरेदीसाठी दरपत्रके मागविणेबाबत.

श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत संस्थान परीसरातील श्री साईनाथ मंगल कार्यालय,जुना पिंपळवाडी रोड व साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० खोल्या,नगर-मनमाड रोड येथे साईभक्तांना चहा,कॉफी,दूध नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात येते. त्या ठिकाणी १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरची आवश्यकता आहे. संस्थानला महिन्याला सरासरी २५० ते ३०० पर्यंत व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर होतो. संस्थानला दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या कालावधीत सदर गॅस रिफिलींग करून देणेकामी खालील अटी शर्ती नुसार याकामी दर मागविण्यात येत आहेत.

१) प्रति १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरकरीता आपणाकडे आगाऊ डिपॉझीट रक्कम भरावी लागेल किंवा नाही ते नमुद करावे. डिपॉझिट रक्कम भरावी लागल्यास सदर रक्कम कळवावी.

२) १९ किलो गॅस सिलेंडरचा पुरवठा हा संस्थानचे कॅन्टीन पोहोचचे लागु असलेले दर हे GST व सर्व समावेशक करासह असतील. त्यासाठी प्रतिमहाचा शासन दर आधारभुत राहील. हमाली,वाहतुक व इतर खर्च वेगळा दिला जाणार नाही.

३) प्रति १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरचे प्रतिमहाचे आधारभुत शासन दरावर (सर्व करांसह) आपण किती रक्कम संस्थानकरीता सवलत (Discount) म्हणुन देणार आहात ते नमुद करावे.

४) कॅन्टीन विभागासाठी जसजसा गॅस सिलेंडरचा वापर होईल तसतसा गॅस सिलेंडरचा पुरवठा करावा लागेल व त्यानुसार बील सादर करावे लागेल. बीलाची रक्कम १५ दिवसांत अदा करण्याचा प्रयत्न राहील.

५) दराबाबत (बिलापोटी) संस्थानकडुन कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.

६) कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखुन ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

७) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याने गॅस रिफीलींगवर जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

८) दराबाबत वाटाघाटी करण्यात येणार नाही. न्युनतम दर देणेचे करावे.

९) सदरची दरपत्रके दि.१२/०३/२०२१ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सिलबंद पाकीटात संस्थानचे मुख्य कार्यालयात प्रत्यक्ष किंवा खालील पत्यावर पाठवावेत. पाकीटावर **"कॅन्टीन विभागाकरीता १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरकरीता दरपत्रके"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी-४२३१०९,
ता.राहाता,जि.अहमदनगर

(बाबासाहेब घोरपडे)
प्रशासकीय अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.